# ***कार्यकारी सारांश***

# कार्यकारी सारांश

1 जून 1993 पासून अंमलात आलेल्या संविधान (चौऱ्याहत्तरावी) सुधारणा अधिनियम, 1992 ने भाग IXए (नगरपालिका) आणि अनुसूची XII लागू केले. संविधान सुधारणा अधिनियमाने नागरी स्थानिक संस्थांना शक्ती आणि अधिकार प्रदान करण्यासाठी आणि बाराव्या अनुसूचीमध्ये समावेश असलेल्या 18 कार्यांचे अधिकार आणि जबाबदाऱ्यांच्या हस्तांतरणासाठी तरतुदी करण्यासाठी आवश्यक असलेले कायदे करण्यासाठी राज्य विधानमंडळाला अधिकृत केले. नगरपालिकांना शासनाच्या तिसऱ्या स्तराचा संविधानिक दर्जा देणे हे चौऱ्याहत्तराव्या संविधान सुधारणा अधिनियमाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. महाराष्ट्रात बृहन्मुंबई महानगरपालिका, राज्यातील इतर महानगरपालिका आणि नगर परिषदा आणि नगर पंचायती या तीन विधिविधानांद्वारे शासित केल्या जातात. चौऱ्याहत्तराव्या संविधान सुधारणेच्या अनुपालनासाठी सर्व तीनही अधिनियमांमध्ये सुधारणा केल्या गेल्या.

हे संपादणूक लेखापरीक्षण संविधान (चौऱ्याहत्तरावी) सुधारणा अधिनियम, 1992 च्या तरतुदी राज्यांच्या विधिविधानांमध्ये समुचित रीतीने समाविष्ट केल्या आहेत आणि नागरी स्थानिक संस्थांकडे मजबूत संस्थात्मक व्यवस्था/सोयी, पुरेसा निधी आणि त्यांना हस्तांतरित केलेली कार्ये पार पाडण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ आहे ह्याचे निर्धारण करण्यासाठी केले होते. 2015-16 ते 2020-21 ह्या कालावधीकरिता लेखापरीक्षण करण्यात आले आणि राज्यातील महानगरपालिका, नगर परिषदा आणि नगर पंचायतींचा समावेश असलेल्या 396 पैकी 44 नागरी स्थानिक संस्थांच्या अभिलेख्यांची चाचणी-तपासणी करण्यात आली. ह्या नागरी स्थानिक संस्थांमधील पाणीपुरवठा, स्वच्छता आणि अग्निशमन सेवा ह्या कार्यांचा लेखापरीक्षेत समावेश होता.

**संपादणूक लेखापरीक्षेतील प्रमुख निष्पत्ती आणि शिफारशी**

प्रकरण-निहाय लेखापरीक्षा निष्पत्ती खालीलप्रमाणे आहेत:

**प्रकरण IV: नागरी स्थानिक संस्थांचे सक्षमीकरण आणि त्यांचे कार्य**

18 कार्यांपैकी, नगर नियोजन, जमीन वापराचे व इमारतींच्या बांधकामाचे विनियमन, गलिच्छ वस्ती सुधार व तिचा दर्जा उंचावणे, पाणीपुरवठा, सार्वजनिक आरोग्य आणि रस्ते व पूल या संबंधातील सहा कार्ये ही शासनसदृश (पॅरास्टेटल) अभिकरणांद्वारे केली जात होती, ज्यामुळे नागरी स्थानिक संस्थांकडे परिकल्पित हस्तांतरण आणि सक्षमीकरण असंहत(डायल्यूट) झाले.

**(परिच्छेद 4.2)**

महापौर व अध्यक्षांना कोणतेही कार्यकारी अधिकार नाहीत तर महानगरपालिकेचे महापौर आणि नगर परिषद/नगर पंचायतीचे अध्यक्ष हे दोघेही जनतेद्वारे थेट निवडले जात नाहीत.

**(परिच्छेद 4.3.2)**

औरंगाबाद महानगर नियोजन समितीने तिच्या गठनापासून म्हणजेच फेब्रुवारी 2015 पासून एकही सभा आयोजित केली नव्हती तर नाशिक महानगर नियोजन समितीने तिच्या गठनापासून म्हणजे जून 2016 पासून एकदाच जुलै 2016 मध्ये सभा आयेजित केली होती. नियोजन क्षेत्राची विकास योजना अद्याप तयार व्हावयाची होती.

**(परिच्छेद 4.5)**

प्रभाग समिति स्थापन करण्यात आणि सभा घेण्यात कमतरता होती.

**(परिच्छेद 4.6)**

राज्य वित्त आयोग स्थापन करण्यात विलंब, त्यांनी केलेल्या शिफारशी विचारात घेण्यात विलंब आणि स्वीकृत शिफारशींनुसार निधी हस्तांतरित करण्यात आलेल्या अपयशाच्या परिणामी नागरी स्थानिक संस्थांना निधी विलंबाने/कमी वितरीत झाला.

**(परिच्छेद 4.8.1 आणि 4.8.2)**

***शिफारशी:***

- ***संविधानानुसार नागरी स्थानिक संस्थांना संपूर्ण हस्तांतरणासाठी शासनाने कालबद्ध कार्यवाही करणे गरजेचे आहे आणि त्यांच्या क्षेत्रामध्ये ही कार्ये पार पाडण्यासाठी त्यांना पर्याप्त स्वायत्तता द्यावी.***
- ***महापौरांना कार्यकारी अधिकार देण्यासाठी व महापौर/अध्यक्षांना जनतेने थेट निवडण्यासाठी प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या शिफारशींवर राज्य शासनाने विचार केला पाहिजे.***
- ***महानगर क्षेत्राच्या एकात्मिक विकासासाठी महानगर नियोजन समिती प्रभावीपणे कार्यरत होण्याची राज्य शासनाने सुनिश्चिती करावी.***
- ***प्रभाग समित्या आणि क्षेत्र सभा स्थापन करण्यासाठी शासनाने पावले उचलावी व त्याच्या परिणामकारक कार्यक्षमतेची खात्री करावी.***
- ***राज्य शासनाने नियत कालावधीमध्ये राज्य वित्त आयोग स्थापन करावा आणि शासनाकडे राज्य वित्त आयोगाचा अहवाल शीघ्रतेने सादर होण्याची सुनिश्चिती करावी. निश्चित कालमर्यादेत शिफारशी विचारात घेण्याची आणि स्विकृत शिफारशींची त्वरित अंमलबजावणी करण्याची देखील राज्य शासनाने सुनिश्चिती करावी.***

- ***शहरी क्षेत्रातील व्यवसाय कर संकलनाचा विदा गोळा करण्यासाठी राज्य शासनाने यंत्रणा स्थापन करावी आणि त्यातील 50 टक्के नागरी स्थानिक संस्थांना वेळेत हस्तांतरित होतील ह्याची सुनिश्चिती करावी.***

**प्रकरण V: नागरी स्थानिक संस्थांची वित्तीय संसाधने**

चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमधील 2015-16 ते 2019-20 दरम्यानचे मालमत्ता कर संकलन 53 टक्के होते, तर बृहन्मुंबई महानगरपालिकेची ह्याच कालावधी दरम्यानची संकलन क्षमता केवळ 28 टक्के होती. चाचणी-तपासणी केलेल्या 30 टक्के नागरी स्थानिक संस्थांनी केंद्र आणि राज्य शासनांच्या मालमत्तेवर मालमत्ता कराच्याऐवजी शुल्क आकारणी केली नव्हती. चाचणी-तपासणी केलेल्या 44 पैकी 34 नागरी स्थानिक संस्थांमध्ये मालमत्तांचे भौगोलिक माहिती प्रणालीनुसार नकाशन पूर्ण झाले नव्हते. चाचणी-तपासणी कलेल्या 44 नागरी स्थानिक संस्थांपैकी फक्त तीन नागरी स्थानिक संस्था भांडवली मुल्यावर मालमत्ता कर आकारत होत्या.

**(परिच्छेद 5.2.1)**

2015-16 ते 2020-21 दरम्यान अतिरिक्त मुद्रांक शुल्क वितरण करण्यामध्ये ₹ 1,220.22 कोटींची कमतरता होती.

**(परिच्छेद 5.3.1)**

2015-16 ते 2020-21 दरम्यान नगरपालिका सहायक अनुदान, तीर्थयात्रा कर आणि रस्ते अनुदान यांच्या वितरणात ₹ 2,679.15 कोटींची कमतरता होती.

**(परिच्छेद 5.4.1, 5.4.3 आणि 5.4.4)**

***शिफारशी:***

- ***केंद्र आणि राज्य शासनाच्या मालमत्तांवर सर्व नागरी स्थानिक संस्थांकडून मालमत्ता कराच्या ऐवजी शुल्क आकारणी केली जाते याची खात्री करून घेण्यासाठी अंतर्गत नियंत्रण व्यवस्था बळकट करायला हवी. नागरी स्थानिक संस्थांकडून भांडवली मुल्यावर आधारित मालमत्ता कराची आकारणी आणि मालमत्तांचे भौगोलिक माहिती प्रणालीनुसार नकाशन कालबद्ध पद्धतीने करण्याची सुद्धा राज्य शासनाने सुनिश्चिती करावी.***
- ***पाचव्या राज्य वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार, अतिरिक्त मुद्रांक शुल्काची संपूर्ण रक्कम, नागरी स्थानिक संस्थांना थेट प्रदान करण्याच्या यंत्रणेचा शासनाने विचार करावा आणि यादरम्यान, संकलित केली गेलेली संपूर्ण रक्कम नागरी स्थानिक संस्थांना हस्तांतरित करण्याची व्यवस्था करावी.***
- ***शासनाने नागरी स्थानिक संस्थांना नियुक्त केलेला महसूल आणि अनुदान कोणत्याही विलंबाशिवाय पूर्ण वितरित करण्याची सुनिश्चिती केली पाहिजे.***

**प्रकरण VI: नागरी स्थानिक संस्थांमधील मानवी संसाधने**

चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये कर्मचाऱ्यांच्या मंजूर संख्येत आणि लोकसंखेत पुष्कळ/व्यापक तफावत होती जी 0.35 प्रति हजार लोकसंख्या ते 15.46 प्रति हजार लोकसंख्या या श्रेणीत होती. चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये मनुष्यबळाची कमतरता 31 टक्के होती.

**(परिच्छेद 6.1)**

लेखापरीक्षेच्या असे निदर्शनास आले की नगर परिषदांमधील सामान्य सेवांच्या अ, ब आणि क श्रेणीच्या निवडीसाठी सल्लागार प्राधिकारी म्हणून कार्य करण्याची जबाबदारी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला देण्यात आली नव्हती. महानगरपालिका क्षेत्रामध्ये कर्मचारी संवर्ग विकसित करण्याची पाचव्या राज्य वित्त आयोगाची शिफारस प्रलंबित होती.

**(परिच्छेद 6.2)**

***शिफारशी:***

- ***पाचव्या राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी लक्षात घेऊन शासनाने नागरी स्थानिक संस्थांमधील मंजूर पदांच्या संख्येचे पुनरावलोकन करावे आणि रिक्त पदे कालबद्ध पद्धतीने भरली जातील याची खात्री करावी.***
- ***सामाईक सेवांसाठी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसाठी सल्लागार प्राधिकरण म्हणून काम करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला जबाबदारी सोपविण्याची आणि महानगरपालिकांसाठी संवर्ग सेवांच्या विकासासाठी जलद कार्यवाही करण्यासाठी शासनाने कार्यवाही करावी.***

**प्रकरण VII: पाणीपुरवठा, स्वच्छता आणि अग्निशमन सेवा पुरवण्यातील परिणामकारकता**

सेवा स्तर निकष निर्देशकानुसार 135 लिटर पाणी प्रति व्यक्ती प्रतिदिनाचा पुरवठा करणे आणि जलमापनाची 100 टक्के व्याप्ती हे चाचणी तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये अनुक्रमे 83 टक्के आणि 69 टक्के साध्य झाले नव्हते. चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांपैकी 67 टक्के नागरी स्थानिक संस्थांमध्ये पाण्याच्या पुरवठ्याचे जलमापन केले नव्हते, तर 42 टक्के नागरी स्थानिक संस्थांमध्ये पाणी पिण्यायोग्य नव्हते. चाचणी तपासणी केलेल्या 89 टक्के नागरी स्थानिक संस्थांमध्ये आकारले जाणारे पाणी शुल्क पुरवठा खर्च पूर्ण करण्यासाठी पुरेसे नव्हते, आणि 88 टक्के संस्थांमध्ये संकलन क्षमता 90 टक्क्यांहून कमी होती.

**(परिच्छेद 7.1.1 to 7.1.5)**

चाचणी-तपासणी केलेल्या 42 पैकी केवळ एका नागरी स्थानिक संस्थेने मलनिःसारण जाळ्याच्या जोडणीचे व्याप्तीक्षेत्र पूर्णतः साध्य केले होते.

**(परिच्छेद 7.2.2)**

चाचणी-तपासणी केलेल्या स्थानिक संस्थांमध्ये अग्निशमन स्थानकांची 61 टक्के कमतरता होती.

**(परिच्छेद 7.3.3)**

***शिफारशी:***

- ***पाणीपुरवठा आणि मलनि:सारण सेवांशी संबंधित सेवा स्तर निकष साध्य करण्यासाठी शासनाने नागरी स्थानिक संस्थांच्या सुमार कामगिरीचे पुनरावलोकन करावे आणि कालबद्ध पद्धतीने त्याच्या सुधारणेसाठी पावले उचलावीत.***
- ***शासनाने महसुलाची हानी टाळण्यासाठी आणि संकलन क्षमता वाढविण्याकरिता सर्व नागरी स्थानिय संस्थांमध्ये पाण्याच्या जोडण्यांचे जलमापन 100 टक्के करण्याची खात्री करावी, ज्यायोगे नागरी स्थानिक संस्थांच्या आर्थिक संसाधनांमध्ये वाढ होईल.***
- ***नागरी स्थानिक संस्थांमधील अग्निशमन स्थानकांच्या कमतरतेच्या मुद्द्याची शासनाने प्राधान्याने दखल घ्यावी.***